तातडीचे / तत्काळ
२०२४४ (७६)
सहसंचालक लेखा व कोषागारे,
पुणे अधिवेशन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
9 SEP 1986
आवक

महाराष्ट्र नागरी सेवा [सुधारित वेतन] नियम, १९७८ अनुसार वेतन पडताळणीसाठी निर्माण केलेली वेतन पडताळणी पथके बंद करण्याबाबत --------

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
परिपत्रक क्रमांक पीसीआर १०८६/आर ३६०/सेवा-१०,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २० ऑगस्ट १९८६.

CR1986082001

## परिपत्रक

संचालक, लेखा व कोषागारे यांच्या अधिपत्याखाली, मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर येथे महाराष्ट्र नागरी सेवा [सुधारित वेतन] नियम, १९७८ अनुसार अराजपत्रित शासकीय कर्मचाऱ्यांची वेतन निश्चितीच्या प्रकरणांची पडताळणी करण्यासाठी जानेवारी १९७९ मध्ये चार वेतन पडताळणी पथके निर्माण करण्यात आली होती. वेतन पडताळणी पथकाचे बहुतांश काम पुरे झाले होते म्हणून शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक: पीसीआर १०८६/सीआर १०५/एसईआर-१०, दिनांक १९ फेब्रुवारी १९८६ अन्वये पुणे व नागपूर येथील वेतन पडताळणी पथके दिनांक १ मार्च १९८६ पासून बंद करण्यात आली आहेत व शिल्लक राहिलेले काम वेतन पडताळणी पथके, मुंबई व औरंगाबाद यांच्याकडे सोपविण्यात आले होते. वेतन पडताळणी पथकांनी जवळ जवळ १०० टक्के सेवा पुस्तके तपासली आहेत. वेतन पडताळणी पथकांनी प्रमाणित केलेल्या सेवा पुस्तका पैकी १० टक्के सेवा पुस्तके महालेखापाल, मुंबई व नागपूर यांनी निर्माण केलेल्या खास वेतन पडताळणी कक्षाने चाचणी दाखल तपासली आहेत. वेतन पडताळणीचे काम आता जवळ जवळ संपत आले आहे. म्हणून शासन असे आदेश देत आहे की मुंबई व औरंगाबाद येथील वेतन पडताळणी पथकेही दिनांक १ सप्टेंबर १९८६ पासून बंद करण्यात यावीत. मंत्रालय विभाग, विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या कार्यालयात राहिलेली [शिल्लक] सेवा पुस्तके दिनांक ३१ ऑगस्ट १९८६ पूर्वी संबंधित वेतन पडताळणी पथकांकडून प्रमाणित करून घ्यावीत. जर सेवा पुस्तके अप्रमाणित करावयाची शिल्लक राहिल्यास त्यांची जबाबदारी सर्वस्वी त्या त्या विभागाची/कार्यालयाची राहिल. १ सप्टेंबर १९८६ नंतर मुंबई व औरंगाबाद येथील वेतन पडताळणी पथकाकडे सेवा पुस्तके पाठविण्यात येऊ नयेत. जर एखाद्या प्रकरणात स्पष्टीकरण किंवा शासनाचे आदेश आवश्यक वाटल्यास अशी प्रकरणे योग्य मार्गाने संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठवावीत.

२. वेतन पडताळणी पथकानी शिकस्तीचे प्रयत्न करूनही जर कांही सेवा पुस्तके प्रमाणित करावयाची शिल्लक राहिल्यास, वेतन पडताळणी पथकानी/महालेखापाल मुंबई/नागपूर यांच्या कक्षांनी प्रमाणित केलेल्या इतर सेवा पुस्तकातील अभिप्रायानुसार, संबंधित कार्यालय प्रमुखाने त्यानी दिनांक १ एप्रिल १९७८ किंवा विकल्पाप्रमाणे केलेली वेतन निश्चिती बरोबर आहे किंवा नाही यांची खात्री करून घ्यावी, व अशी अप्रमाणित सेवा पुस्तका मध्ये खालील प्रमाणे प्रमाणपत्राची नोंद घ्यावी. हे काम दिनांक ३१ डिसेंबर १९८६ पर्यन्त पूर्ण करावे.

कृ. मा. प.

शा. म. मु. रोटा/वि. वि. /एच-५१५[१०,०००+१०-८-८६]

प्रमाणपत्र
-------

" प्रमाणित करण्यात येते की, कार्यालयीन आदेश क्रमांक ------------------------------
--------------------- दिनांक ------------------------- अन्वये माझ्या कार्यालयाने केलेली वेतन निश्चिती, वेतन पडताळणी पथके / महालेखापाल, मुंबई / नागपूर यांच्या कक्षाने या विभागातील इतर कर्मचा-यांच्या प्रमाणित केलेल्या सेवा पुस्तकातील अभिप्रायानुसार परत तपासण्यात आली व माझ्या कार्यालयाने दिनांक १ एप्रिल, १९७६ किंवा विकल्पाप्रमाणे केलेली वेतन निश्चिती बरोबर आहे.

दिनांक                    १९८६.                    "

विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मं. मं. कोरगांवकर,
अवर सचिव, वित्त विभाग.

महालेखापाल-१ [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल-१ [लेखा परीक्षा], महाराष्ट्र राज्य, मुंबई,
महालेखापाल-२ [लेखा परीक्षा], महाराष्ट्र राज्य, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख,
लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई [५ प्रतींसह],
सर्व उप संचालक, लेखा व कोषागारे,
वरिष्ठ कोषागारे अधिकारी, पुणे, नागपूर, औरंगाबाद,
सर्व कोषागार अधिकारी,
लेखा अधिकारी, वेतन पडताळणी पथक विभाग, मुंबई, औरंगाबाद,
निवड नस्ती, सेवा-१०.

---------

एचु-५१५[१०,०००+१०-८-८६]-अ.